आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. जगाला युद्ध नव्हे बुद्ध हवा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिधम्म दिवस समारंभात प्रतिपादन.
2. विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना करावी लागणार गुन्हेगारी पार्श्वभूमीची प्रसिद्धी.
3. रेल्वे आरक्षणाची १२० दिवसांची मर्यादा आता ६० दिवस होणार.
4. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या डावात भारतीय संघ अवघ्या ४६ धावांत गारद.

---------------------------------------

अभिधम्म दिवस

भाषा केवळ संवादाचं माध्यम नसून, सभ्यता आणि संस्कृतीचा आत्मा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अभिधम्म दिवस आणि पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानिमित्त नवी दिल्लीत, आंतरराष्ट्रीय बुद्धिस्ट महासंघ आणि सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्यानं घेण्यात आलेल्या समारंभात ते आज बोलत होते. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा हा भगवान बुद्धांच्या महान वारशाचा सन्मान असल्याचं पंतप्रधान म्हणाले. करुणा आणि सद्भावनेमुळेच आपण जगाला अधिक चांगलं बनवू शकतो, याची आठवण हा अभिधम्म दिवस आपल्याला करुन देतो, असं त्यांनी नमूद केलं. जगाला युद्ध नव्हे बुद्ध हवा आहे असं मोदी यावेळी म्हणाले. -

*आज एक बार फिर विश्व कई अस्थिरताओं और आशंकाओं से घिरा है, ऐसे में बुद्ध न केवल प्रासंगिक है बल्कि अपरिहार्य भी बन चुके हैं। भारत ने विश्व को युद्ध नहीं बुद्ध दिए और आज में बड़े विश्वास से कहता हूं, पूरे विश्व को युद्ध में नहीं बुद्ध में ही समाधान मिलेंगे।*

---------------------------------------

गुन्हेगारी पार्श्वभूमी

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 लढविणारे उमेदवार आणि त्यांच्या राजकीय पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार गुन्हेगारी पार्श्वभूमीची प्रसिद्धी करावी लागणार आहे. भारत निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याबाबत सविस्तर निर्देश आणि प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती

प्रसिद्ध करण्यासाठी विहीत नमुने देखील निर्गमित केले आहेत. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक आयोगाने विहीत केलेल्या शपथपत्रातील नमुन्यात प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची परिपूर्ण माहिती देणं, उमेदवार एखाद्या राजकीय पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवत असेल, तर अशा उमेदवारांनी त्यांच्याविरुद्ध प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती संबंधित पक्षास अवगत करणं, तसंच राजकीय पक्षांनी त्यांच्या उमेदवारांविरुद्ध प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती पक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणं देखील बंधनकारक आहे. उमेदवाराविरुद्ध प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर **Know Your Candidate** या लिंकवर उपलब्ध राहील.

---------------------------------------

आयकर

महाराष्ट्र विधानसभा  निवडणूक पारदर्शकपणे पार पाडण्यासोबतच या दरम्यान काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी प्राप्तीकर विभागाने टोल फ्री तसेच व्हॉट्सॲप क्रमांकासह ई-मेल पत्ता जारी केला आहे. निवडणुकां दरम्यान पैशांचा  वापर होत असल्सास त्यावर माहिती देण्याचं  आवाहन करण्यात आलं  आहे.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयकर विभाग तयार असून दरम्यानच्या कालावधीत काळ्या पैशांच्या व्यवहारावर बारीक नजर ठेवण्यात येणार आहे. निवडणुकीत वापरला जाणारा काळा पैसा, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल आदी संशयास्पद गोष्टी नजरेस पडल्यास नागरिकांनी थेट आयकर विभागाशी संपर्क साधावा. संबंधित माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख ही गुप्त ठेवण्यात येणार आहे.नागरिकांनी माहिती देण्यासाठी 1800-233-0355 किंवा 1800-233-0356 या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. एखाद्या घटनेची छायाचित्रे, व्हिडिओ ईत्यादी माहिती 94033 90980 या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावीत. त्याचप्रमाणे **nagpur.addldit.inv@incometax.gov.in** किंवा **nashik.addldit.inv @incometax.gov.in** या मेल आयडीवर मेलही करता येईल.

---------------------------------------

रवींद्र चव्हाण

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वसंतराव चव्हाण यांचे ते सुपुत्र आहेत. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं इथं पोटनिवडणूक होत आहे.

---------------------------------------

सामूहिक राजीनामा

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातल्या ६०० पदाधिकाऱ्यांनी नुकताच सामूहिक राजीनामा दिला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुण्याचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांना विधानपरिषदेच्या

राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये संधी न दिल्यामुळे कार्यकर्ते नाराज झाले असून त्यामुळे पुणे शहर पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामा दिल्याचं सांगण्यात येत आहे.

'आढावा विधानसभा मतदारसंघांचा'

विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम आजपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या **Youtube** चॅनल्सवरुन हा कार्यक्रम आपण ऐकू शकाल. आज या कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

---

रेल्वे आरक्षण

रेल्वे आरक्षणाची १२० दिवसांची मर्यादा आता ६० दिवस होणार आहे. त्यामुळं प्रवास करण्यापूर्वी ६० दिवस आधी तिकिट आरक्षित करता येईल. येत्या १ नोव्हेंबरपासून याची अंमलबजावणी सुरू होणार असल्याचं रेल्वे बोर्डानं कळवलं आहे. सध्या तिकिट आरक्षित केलेल्या नागरिकांना या निर्णयाचा काहीही फटका बसणार नाही. पण नव्यानं आरक्षण करणाऱ्यांना १ नोव्हेंबरपासून केवळ ६० दिवस पर्यंतचीच तिकिट आरक्षित करता येतील. परदेशी प्रवाशांसाठी ही मर्यादा पूर्वीप्रमाणे ३६५ दिवस असेल.

---

कसोटी क्रिकेट

कसोटी क्रमवारीत आंतरराष्ट्रीय पातळीवर पहिल्या स्थानावर असलेला भारतीय संघ, न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्याच्या पहिला डावात अवघ्या ४६ धावात तंबूत परतला. भारताची ही देशातली सर्वात कमी आणि एकूण तिसऱ्या क्रमांकाची किमान धावसंख्या आहे. बेंगळुरूमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला भारतीय संघ खेळपट्टीवर टिकाव धरू शकला नाही. विराट कोहलीसह भारताचे एकूण ५ खेळाडू शून्यावर बाद झाले. रिषभ पंतनं २० आणि यशस्वी जयस्वालनं १३ धावा केल्या. मॅट हेन्रीनं १५ धावात ५ गडी बाद केले. विल्यम ओरूक यानं १२ धावात ४ भारतीय खेळाडूंना तंबूत परत पाठवलं. भारत आणि न्यूझीलंड मध्ये एकूण ३ कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. या मालिकेतील पहिल्या सामन्याचा आज दुसरा दिवस आहे. पावसामुळं काल पहिल्या दिवशी खेळ होऊ शकला नव्हता. आज दुसऱ्या दिवशी न्यूझीलंडच्या ३ बाद १८० धावा झाल्या आहेत. जागतिक कसोटी क्रमवारीत भारत सध्या सर्वोच्च स्थानावर असून न्यूझीलंड सहाव्या स्थानी आहे. यापूर्वी बांग्लादेशासोबत खेळलेली मालिका भारतानं २-० अशी जिंकली होती. तर न्यूझीलंडनं श्रीलंकेविरोधातली मालिका ०-२ अशी गमावली आहे.

---

प्रमाणपत्र परीक्षा वेळापत्रक

फेब्रुवारी-मार्च **2025** मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता **12**वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता **10**वीच्या लेखी परीक्षेची सविस्तर वेळापत्रके महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर अद्याप प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत, असं स्पष्टीकरण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दिलं आहे. या परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत समाजमाध्यमाहून प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती चुकीची असून ती ग्राह्य धरण्यात येऊ नये, असं  आवाहनही त्यांनी केलं आहे.

--------------------------------------

एनटीए

यंदा जून महिन्यात एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेने घेतलेल्या यूजीसी नेट २०२४ परीक्षेचा निकाल उद्या १८ ऑक्टोबर रोजी जाहीर केला जाईल. राष्ट्रीय चाचणी संस्थेने समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे.

--------------------------------------

अखंड घुंगरू नाद 2024

धरमपेठ शिक्षण संस्था द्वारा संचालित नटराज आर्ट अँड कल्चर सेंटरद्वारा रविवार, दिनांक 20 ऑक्टोबर रोजी ‘अखंड घुंगरू नाद 2024’ हा शास्त्रीय नृत्यांवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून देशभरातील 200 शास्त्रीय नृत्य कलाकार सलग 12 तास नृत्य सादर करणार आहेत. नटराज आर्ट अँड कल्चर सेंटर, धरमपेठ इथं  सकाळी 7.30 वाजता नटराज पूजनाने या कार्यक्रमाला सुरुवात होईल. अखंड घुंगरू नादचे यंदाचे तिसरे वर्ष असून यावर्षी पहिल्यांदाच महाराष्ट्रासह केरळ, पश्चिम बंगाल, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड आदी राज्यातून आलेले कथकली, भरतनाट्यम, कथक, ओडिसी, मणिपुरी, मोहिनीअट्टम, कुचिपुडी आदी प्रकारातील नृत्य कलाकार या उपक्रमात सहभगी  होत आहेत.

--------------------------------------

महर्षि वाल्मिकी जयंती

रामायण' महाकाव्याचे रचनाकार महाकवी महर्षि वाल्मिकी यांची जयंती आज, राष्ट्रसंत तुकडोजि महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात, तसेच महावितरण कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

--------------------------------------